फुलशेती

# ‘गुलटोपा’ची फुले मिळवून देतील नफा




**प्रा. भूषण तायडे**

(मो.नं. ९७६६८०८३२४)

फुलशेती व लॅन्डस्केपिंग विभाग,

क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक




गुलटोपाच्या झाडांना जास्त खते द्यावी लागत नाहीत. थोड्या खतांनाही चांगला प्रतिसाद मिळतो. लागवडीसाठी वाफे तयार करताना दर चौरस मीटर जागेसाठी १० किलो चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. गुलटोपाच्या मुळ्या उथळ वाढतात त्यामुळे आंतरमशागत करण्याची गरज नसते. पाणी अशा प्रकारे द्यावे की सतत पाण्याचा पुरवठा होईल. झाडांचे शेंडे खुडल्यामुळे (पिंचिंग) बाजूच्या फांद्यांची संख्या वाढते आणि त्यामुळे फुलांचे उत्पादन वाढते.

गुलटोप हे भारतीय फुलझाड असून त्याचा जगभर प्रसार झाला आहे. या फुलझाडाला 'ग्लोब अमारांथ' किवा 'बॅचलर्स बटन' या नावाने ओळखतात. याची लागवड बागेतील वाफ्यात आणि किनारीवर कट फ्लॉवर म्हणून करतात. गुलटोपाच्या ठेंगण्या जाती किनारीसाठी आणि खडक बागेसाठी (Rockery) योग्य असतात. गुलटोपाची फुले ताजी किंवा वाळवून वापरतात. गुलटोपाची वाळलेली फुले पुष्परचनेसाठी आणि सजावटीसाठी वापरतात. या फुलांचा रंग वाळल्यानंतर देखील कायम राहतो. या फुलझाडाची कुंडीतही लागवड करता येते.

गुलटोपाची झाडे उंच ( ४५ ते ६० सें.मी.) व ठेंगणी (२० ते २५ सें.मी.) असतात. या झाडाची पाने लांब व रुंद असतात. पानांच्या वरच्या खोडावर २ सें.मी. व्यासाची बटनाप्रमाणे गोलाकार लहान फुले असतात. गुलटोपाची फुले गुलाबी, फिकट नारिंगी, पिवळी व पांढरी अशा विविध रंगांची असतात. फुलांचा पोत कागदाप्रमाणे असतो आणि फुले दीर्घकाळ टिकतात. फुलांचे दांडे लांब, बारीक आणि मजबूत असतात.

**हवामान व जमीन** : गुलटोपाची झाडे वार्षिक व काटक असतात. त्यामुळे ही झाडे सहजपणे कोणत्याही प्रकारच्या हलक्या आणि उत्तम निचऱ्याच्या जमिनीत वाढतात. गुलटोपाची झाडे पाणथळ जागीही चांगली वाढतात. मात्र झाडांच्या चांगल्या वाढीसाठी लागवडीची जागा सूर्यप्रकाशात असावी.

**उन्नत जाती** : या फुलझाडाच्या पांढरी, नारिंगी, पिवळी, गुलाबी, जांभळी व मोतिया अशी विविधरंगी फुले येणाऱ्या जाती उपलब्ध आहेत. गुलटोपाच्या 'बडी' नावाच्या जातीची झाडे आटोपशीर अशी १५ सें.मी. उंच असून त्यांना जांभळ्या रंगाची दीर्घकाळ टिकणारी फुले येतात . सर्वसाधारणपणे 'ग्लोबोसा मिक्स्ड'(उंच) 'लिलिपुट बडी'





(ठेंगणी) आणि 'सिसी' या जातीची लागवड करतात. 'सिसी' या जातीची झाडे १५ ते २५ सें.मी. पर्यंत वाढतात.

**अभिवृद्धी व लागवड** : गुलटोपाची अभिवृद्धी बियांपासून करतात. बियांची पेरणी गादी वाफ्यात किवा पसरट भांड्यात जानेवारी ते मार्च महिन्यात करावी म्हणजे उन्हाळ्यात फुले मिळतात. बियांची पेरणी एप्रिल ते सप्टेंबर महिन्यातही करता येते. मे ते जून महिन्यात पेरणी केल्यास पावसाळ्यात फुले मिळतात. उष्ण कटिबंधात उन्हाळ्यात व पावसाळ्यात इतर कट फ्लॉवर्स दुर्मिळ असतात. त्यामुळे गुलटोपांच्या फुलांना चांगला भाव मिळतो. सौम्य हवामानात गुलटोपाची झाडे वर्षभर फुललेली असतात. डोंगरी प्रदेशात गुलटोपाची पेरणी मार्च –एप्रिल महिन्यात करावी त्यानंतर रोपांचे स्थलांतर कायम वाफ्यात करावे.

रोपवाटिकेतील रोपे ३ ते ४ सें.मी. उंच वाढल्यानंतर त्या रोपांची लागवड लावणी बागेतील वाफ्यात २० ते ३० सें.मी. अंतरावर करावी. 'बडी' जातीच्या बियांची पेरणी कुंड्यांमध्ये करता येते.

**खते आणि पाणी** : गुलटोपाच्या झाडांना जास्त खते द्यावी लागत नाहीत. थोड्या खतांनाही चांगला प्रतिसाद मिळतो. लागवडीसाठी वाफे तयार करताना दर चौरस मीटर जागेसाठी १० किलो चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. गुलटोपाच्या मुळ्या उथळ वाढतात त्यामुळे आंतरमशागत करण्याची गरज नसते. पाणी अशा प्रकारे द्यावे की सतत पाण्याचा पुरवठा होईल. झाडांचे शेंडे खुडल्यामुळे (पिंचिंग) बाजूच्या फांद्यांची संख्या वाढते आणि त्यामुळे फुलांचे उत्पादन वाढते.

**फुलांची काढणी** : पेरणीपासून सुमारे ७५ ते ८० दिवसांनी गुलटोपाच्या झाडांना फुले येण्यास सुरवात होते. गुलटोपाची फुले झाडावर दीर्घकाळ टिकतात. काढणीनंतरदेखील ही फुले जास्त काळ टिकतात. गुलटोपाची फुले सुकविल्यानंतरही फुलांचा रंग टिकून राहतो. ■